# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११०१८
## मा.इ प्रभाग समिती
## कार्यपत्रिका क्रमांक- ०३
## सभावृत्तांत

दिनांक - ५/१०/२०१७ वेळ दुपारी २:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा गुरुवार दि.०५/१०/२०१७ रोजी दुपारी २.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

**१) मा.फुगे भिमाबाई पोपट - अध्यक्षा**

२) मा.सुवर्णा विकास बुर्डे

३) मा.श्री लक्ष्मणशेठ सोपान सस्ते

४) मा. श्री उंडे लक्ष्मण धोंडू

५) मा.गायकवाड निर्मला मनोज

६) मा.श्री.सागर बाळासाहेब गवळी

७) मा.बारसे प्रियांका प्रविण

८) मा.अजित दामोदर गव्हाणे

९) मा.श्री.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

१०) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

११) मा.Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.श्री.चंद्रकांत इंदलकर- क्षेत्रीय अधिकारी, मा.श्री.प्रमोद काशीकर – प्रशासन अधिकारी मा.श्री.जीवन गायकवाड, कार्य अभियंता (स्थापत्य), मा.श्री.बोरावके डी.एच. उपअभियंता (स्थापत्य). मा.श्री.क्षीरसागर आर.व्ही. क.अभियंता (स्थापत्य), मा.श्री.दवंडे शशिकांत उपअभियंता (पा.पु.),मा.श्री.एस.आय.खोंद्रे-उपअभियंता झोनिपू स्थापत्य, मा. श्री. कोतकर पी.बी.क.अभियंता (पा.पु.), मा.श्री.शेख एस.के.-क.अभियंता, (पा.पु.), मा.श्री.आर.व्ही शिंदे - उपअभियंता (स्थापत्य), श्री.बी.डी.गवळी - उपअभियंता (ज.नि.), श्री.बेळगांवकर एस.एस. क.अभियंता (पा.पु.), श्री.कातोरे–पी.बी.क.अभियंता(विद्युत), श्री.पवार व्ही.एस क.अभियंता (विद्युत) श्री. निकम-लेखाधिकारी, मा.श्री.तावरे-सहा.आरोग्य अधिकारी, श्री.संदीप ठोकळे - क.अभियंता (ज.नि.),श्री.गनबोटे ए.पी. क.अभियंता(स्थापत्य), श्री.वाडकर एस.व्ही. क. अभियंता (स्थापत्य) श्रीम.वृषाली पोतदार - क.अभियंता(स्थापत्य), श्री.एन.एच.पारसी- आ.नि. पशुवैद्यकिय, श्री.निखील फेंडर क.अभियंता (स्थापत्य उद्यान.) श्री.गायकवाड पी.आर.मुख्याध्यापक माध्य.विद्यालय,भोसरी, श्री.कुलकर्णी एस.एम. सहा.शिक्षक माध्य.विद्यालय, भोसरी, श्री.चोरघे एस. एस. समाजसेवक, नागरवस्ती विभाग, सौ.भोज जे.एस.- क्रीडा पर्यवेक्षक हे अधिकारी / कर्मचारी सभेस उपस्थित होते.

**मा.अध्यक्षा -** सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

**-----**

**विषय क्रमांक – १)** इ प्रभाग समिती सभेमध्ये विकास योजनेतील रस्ता रुंदीकरण ठराव करणेबाबत मा. अजित दामोदर गव्हाणे यांचे पत्र.

**विषय क्रमांक –** २) प्रभाग क्र. ५ मधील भोसरी सर्व्हे नं.२०० मधून जय महाराष्ट्र चौक ते शास्त्री चौकापर्यंत ६ मी.रुंदीचा रस्ता, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २०५ अन्वये सार्वजनिक रस्ता म्हणून घोषित करणेबाबत. मा. सागर बाळासाहेब गवळी यांचे पत्र.

**विषय क्रमांक –** ३) प्रभाग क्र.३ मोशी च-होली बोराटे आळी येथील शौचालय पाडणेबाबत मा.लक्ष्मण सोपान सस्ते यांचे दिनांक ३/१०/२०१७ चे पत्र.

**विषय क्रमांक –** ४) बोपखेल गावातील रस्त्यांना नांवे देणेबाबत.सौ.हिराबाई (नानी) गोवर्धन घुले यांचे पत्र.

**विषय क्रमांक –** ५) इ प्रभाग समिती सभेमध्ये स्केटींग ग्राऊंड कै.हिरामण शिवराम गवळी यांचे नांव देणेबाबतचा ठराव करणेकामी मा.अजित दामोदर गव्हाणे यांचे पत्र.

**विषय क्रमांक –** ६) इ टॉयलेट करणेबाबत. मा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे यांचे पत्र.

**विषय क्रमांक –** ७) गव्हाणे वस्ती, भोसरी येथील उद्यानास नाव देणेबाबत. मा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे यांचे पत्र.

**------**

अ) दिनांक ०७/९/२०१७ रोजीची रोजी झालेल्या सभेचा (कार्यक्रमपत्रिका ०२) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

--------

ठराव क्रमांक - ६ विषय क्रमांक- १

दिनांक- - ०५/१०/२०१७

सूचक- मा. अनुमोदक – मा.

संदर्भ – ठेकेदार पध्दतीने नाले व गटरसाफ करणे या लेखाशिर्षामधून ठेकेदार पध्दतीने हायसिंथ निर्मूलन करणे या लेखा शिर्षावर तरतुद वर्ग करणे बाबत...

इ क्षेत्रीय कार्यालयाकडील आरोग्य विभागामध्ये सन २०१६ -२०१७ चे अंदाज पत्रकीय तरतुद मध्ये आरोग्य विभागातील ठेकेदार पध्दतीने नाले व गटरसाफ करणे या लेखाशीर्षावर तरतुद र.रू २३,००,०००/- करणेत आलेली आहे. नाले सफाईची र.रु १२,२३,५५७/- ची निविदा काढण्यात आली. या लेखाशिर्षावर र.रु १०,७६,४४३/- शिल्लक आहे. तसेच स्ट्रॉर्म वॉटर पावसाळी गटर्स साफसफाई करणे हे लेखाशिर्षावर इ क्षेत्रीय आरोग्य विभागाकडे तरतुद

करण्यात आली नाही. त्यामुळे स्ट्रॉर्म वॉटर पावसाळी गटर्स साफसफाई करणे याची र.रु.३,०१,८०६/- इतक्या रकमेची निविदा काढणेत आली आहे. या दोन्हीची एकुण र.रु.१५,२५,३६३/- वजाजाता र.रु. ७,७४,६३७/- इतकी रक्कम शिल्लक राहते. ठेकेदारपध्दतीने हायसिंथ निर्मूलन करणे या लेखाशिर्षावर आज दि. ३१/५/२०१६ रोजी र.रु. १०,०००/- इतकी तरतूद शिल्लक आहे. तसेच आर्थिक वर्ष सन २०१५-१६ मधील मे. दत्तकृपा स्वयंरोजगार संस्था यांचे इंद्रायणी नदीपात्रातील जलपर्णी / हायसिंथ काढणे कामाचे उर्वरीत बील र. रु. ३९३४८/- त्या आर्थिक वर्षात तरतूद शिल्लक नसल्यामुळे सदरचे बील चालू आर्थिक वर्षात अदा करणे आवश्यक आहे. त्यामुळे ठेकेदारी पध्दतीने नाले व गटर साफ करणे या लेखाशिर्षावरुन सदरची रक्कम वर्ग करता येणे शक्य आहे. तरी ठेकेदार पध्दतीने नाले व गटरसाफ करणे या लेखाशिर्षामधून ठेकेदार पध्दतीने हायसिंथ निर्मूलन करणे या लेखाशिर्षावर र. रु. ३५,०००/- इतकी रक्कम वर्ग करता येणे शक्य आहे. **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०३ अन्वये एका अर्थसंकल्पीय शिर्षातून दुस-या अर्थसंकल्पीय शिर्षात वर्ग करावयाच्या रकमा नियमानुसार वर्ग करता येत असल्याने सदरच्या विषयाबाबत अवलोकनार्थ सादर करणेबाबतचा विषय मागे घेणेत आलेला आहे.**

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक - ७ विषय क्रमांक- २

दिनांक- - ०५/१०/२०१७

सूचक- मा. प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे अनुमोदक – मा.सुवर्णा विकास बुर्डे

संदर्भ – अस्थायी अस्थापना या लेखा शीर्षावरील तरतुद प्रवास भत्ता लेखा शिर्षावर वर्ग करणे बाबत...

इ क्षेत्रीय कार्यालयाकडील आरोग्य विभागामध्ये सन २०१७ -२०१८ चे अंदाज पत्रकीय तरतुद मध्ये **प्रवास भत्ता** या लेखाशीर्षावर र. रू १००००/- इतकी तरतुद करणेत आलेली आहे. दिनांक २६/६/२०१७ ते ३०/६/१७ या कालावधीमध्ये सहा.आरोग्याधिकारी श्री.प्रभाकर रामचंद्र तावरे इ क्षेत्रीय कार्यालय हे दिल्ली येथे प्रशिक्षणाकामी गेले होते. त्यांनी पुणे ते दिल्ली प्रवासाची जाणे व येण्याची विमानाची तिकीटे सादर केली असुन सदरचा खर्च रक्कम रु.१४०००/- हा प्रवास खर्च झाला आहे. तसेच भावी काळात पुन्हा सहा.आरोग्याधिकारी यांना प्रशिक्षणास जाण्याची शक्यता असलेने त्याचा येणारा आंदाजे खर्च रक्कम रु.१५०००/- तसेच पंढरपुर यात्रे निमित्त साफ सफाईच्या कामासाठी नेमणुक केलेल्या सफाई कर्मचा-यांची प्रवास भत्याची व दैनिक भत्याची रक्कम अदा करावी लागणार आहे. सबब सध्या प्रवास भत्ता लेखा शिर्षावर सध्या असलेली र.रु.१००००/- तरतुद कमी पडत असुन, येणारा खर्च लक्षात घेता, सन २०१७ – १८ साठी सदरची तरतुद र.रु.६००००/- करणेत यावी असे प्रस्तावित वाटते त्यासाठी इ क्षेत्रिय आरोग्य विभागाच्या अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षावर र.रु. १०००००/- इतकी तरतुद आहे. सदर तरतुदीमधुन एप्रिल २०१७ ते जुलै २०१७ अखेर झालेला खर्च निरंक आहे. सबब अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षावरुन र.रु.५००००/- इतकी तरतुद प्रवास भत्ता लेखाशिर्षावर वर्ग करता येणे शक्य आहे. सदरच्या विषयास मान्यता देणेत येत आहे. सदरचा सभावृत्तांत कायम होणेचे वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक - ८ विषय क्रमांक- ३

दिनांक- - ०५/१०/२०१७

सूचक- मा. लक्ष्मण धोंडू उंडे अनुमोदक – मा.निर्मला गायकवाड

संदर्भ – प्रभाग क्र.दिघी येथील साईपार्क कॉलनीचे नामकरण करणेबाबत.मा.लक्ष्मण धोंडू उंडे (माजी सैनिक) यांचे पत्र.

प्रभाग क्र. ४, दिघी येथील साईपार्क कॉलनीला अदिशक्ती कॉलनी नं.१,२,३,४ अशा प्रकारे नामकरण करणेबाबत व त्यानुसार नामफलक करणेबाबत कार्यवाही करणेसाठी सदरचा विषयास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

**यानंतर सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले.**

**-------**

ठराव क्रमांक - ९ विषय क्रमांक- १

दिनांक- - ०५/१०/२०१७

सूचक- मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.अजित गव्हाणे

संदर्भ – मा.अजित गव्हाणे यांचे दिनांक ५/१०/२०१७ चे पत्र.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे भोसरी येथील स.न. २०७ पै.ते.२१८ पै मंजूर विकास योजनेतील दक्षिणोत्तर १८.०० मी.रुंद रस्त्यापासून ते स.न.२०५ पै.मधील ६.०० मी.रुंदीच्या रस्त्याला जोडणारा पुर्व पश्चिम रस्ता स.न.२०६ पै. व २०७ पै.कच्च्या स्वरुपात जाणे येणे करीता नागरीक वापर करीत आहेत. सदरचा रस्ता म.न.पा.ने ताब्यात घेऊन विकसीत केल्यास तेथील नागरीकांचा दळणवळणाचा प्रश्न कायमचा सुटणार आहे. तरी स.न.२०७ पै. व २०६ पै. विकास योजने व्यतिरीक्त पूर्व पश्चिम रस्ता १२ मीटर रुंदीचा करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५ अन्वये घोषीत करण्यास ठरावास मान्यता देण्यात येत आहे. सदरचा ठराव कायम होणेचे वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक - १० विषय क्रमांक- २

दिनांक- - ०५/१०/२०१७

सूचक- मा.- सौ.प्रियांका बारसे अनुमोदक – मा.अजित गव्हाणे

संदर्भ – प्रभाग क्र. ५ मधील भोसरी सर्व्हे नं.२०० मधून जय महाराष्ट्र चौक ते शास्त्रीचौकापर्यंत ६ मी.रुंदीचा रस्ता, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २०५ अन्वये सार्वजनिक रस्ता म्हणून घोषित करणेबाबत. मा. सागर बाळासाहेब गवळी यांचे दिनांक ३/१०/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र. ५ मधील भोसरी सर्व्हे नं.२०० गुळवे मैदान मधून जय महाराष्ट्र चौक ते शास्त्री चौका पर्यंत दुर्गामाता कॉलनी वसाहतीच्या बाजूने सहा (६) मीटर रुंदीचा रस्ता महाराष्ट्र चौक ते शास्त्री चौकापर्यंत ६ मी.रुंदीचा रस्ता, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २०५ अन्वये सार्वजनिक रस्ता म्हणून घोषित करणेकामी प्रस्ताव मंजूर करुन पुढील कार्यवाहीसाठी नगररचना विभागामार्फत शहर सुधारणा समितीकडे सादर करण्यात यावा याबाबत मान्यता देणेत येत आहे. सदरचा सभावृत्तांत कायम होणेचे वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक - ११ विषय क्रमांक- ३

दिनांक- - ०५/१०/२०१७

सूचक- मा.लक्ष्मण सोपान सस्ते अनुमोदक – मा.सुवर्णा विकास बुर्डे

संदर्भ – प्रभाग क्र.३ मोशी च-होली बोराटे आळी येथील शौचालय पाडणेबाबत

मा.लक्ष्मण सोपान सस्ते यांचे दिनांक ३/१०/२०१७ चे पत्र.

उपरोक्त विषयानुसार प्रभाग क्र.३ मोशी च-होली बोराटे आळी येथे म.न.पा. चे सार्वतजनिक शौचालय बरेचसे जुने झालेले असून सेप्टिक टँक बांधलेले आहे. त्यामुळे सदरचे शौचालय धोकादायक वाटते. तरी सदरचे शौचालय पाडण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक - १२ विषय क्रमांक- ४

दिनांक- - ०५/१०/२०१७

सूचक- मा.लक्ष्मण ऊंडे अनुमोदक – मा. निर्मला गायकवाड

संदर्भ – मा.स.हिराबाई (नानी) गोवर्धन घुले दिनांक ५/१०/२०१७ चे पत्र.

बोपखेल गावामधील रस्त्यांना नावे देण्याबाबत खालीलप्रमाणे शिफारस करणेत येत आहे.

१) झपके वाडा ते माणिकपार्क या रस्त्यासाठी कै. ठकू बाळा जगदाळे यांचे नाव देणेत यावे. या सामाजिक कार्यकर्त्याने गावासाठी केलेल्या कामाचे योगदान खूप मोठे आहे. त्यांनी केलेल्या कामाचे प्रतिक म्हणून त्यांचे नाव कै.ठकू बाळा जगदाळे सदर रस्त्यासाठी देण्यात यावे अशा परीसरातील सर्व नागरीकांची मागणी आहे.

२) गणेशनगर ते बोपखेल या रस्त्यासाठी वै.ह.भ.प. परशुराम (भाऊ) भिकू घुले यांचे नाव देणेत यावे. या वारकरी सांप्रदायातील गावामधील अत्यंत लोकप्रिय व सामाजिक कार्यामध्ये सदोदीत हिरीरीने भाग घेणा-या या कार्यकर्त्यांचे नाव वै. ह.भ.प.परशुराम (भाऊ) भिकू घुले सदर रस्त्यास देण्यात यावे जेणेकरुन त्यांच्या कर्तृत्वाचे स्मरण कायम राहील अशी सर्व नागरीकांची मागणी आहे त्यास मान्यता देणेत येत आहे. सदरचा ठराव कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक - १३ विषय क्रमांक- ५

दिनांक- - ०५/१०/२०१७

सूचक- मा.सौ.प्रियंका बारसे अनुमोदक – मा.Adv.नितीन लांडगे

संदर्भ – इ प्रभाग समितीमध्ये ठराव करणेबाबत.. मा.अजित दामोदर गव्हाणे यांचे

दिनांक ५/१०/२०१७ चे पत्र.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील भोसरी प्रभाग क्र.५ मधील स.न.२१८/२ पै स्केटींग ग्राऊंडचे आरक्षण असुन सदर आरक्षणाला कै.हिरामण शिवराम गवळी यांचे नांव देण्यास मान्यता देण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक - १४ विषय क्रमांक- ६

दिनांक- - ०५/१०/२०१७

सूचक- मा.संतोष (अण्णा) लोंढे अनुमोदक – मा.Adv.नितीन लांडगे

संदर्भ – ई- टॉयलेट करणेबाबत मा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे यांचे पत्र.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत निगडी येथे ई-टॉयलेट लवकरच बसविण्यात येणार आहे. त्याच पध्दतीचे ई-टॉयलेट माझ्या प्रभाग क्र. ७ भोसरी या परीसरात बसविण्यात यावेत. टॉयलेटची सोय नसल्याने नागरीकांची खूपच गैरसोय होत असून टॉयलेटची नेहमीच नागरीक मागणी करीत आहे. तरी १) राजमाता उड्डाणपूल, चांदणी चौक २) दत्त मंदीर रोड, वॉकींग प्लाझा ३) पवना बँकेसमोर, पुलाखाली ४) आढळराव पाटील-खासदार याच्या कार्यालयासमोर, पुलाखाली ५) दिघी रोड समोर, पुलाखाली व ६) लांडेवाडी झोपडपट्टी समोर या सहा ठिकाणी ई- टॉयलेट करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक - १५ विषय क्रमांक- ७

दिनांक- - ०५/१०/२०१७

सूचक- मा.संतोष (अण्णा) लोंढे अनुमोदक – मा.Adv.नितीन लांडगे

संदर्भ – गव्हाणेवस्ती, भोसरी येथील उद्यानास कै.वामनराव गव्हाणे (पाटील) उद्यान नाव देणेबाबत. प्रा. सोनाली दत्तात्रय गव्हाणे यांचे दिनांक ५/१०/२०१७ चे पत्र.

उपरोक्त विषयान्वये भोसरी शहरामध्ये गव्हाणेवस्ती येथे नागरीकांच्या मागणीनुसार अद्यावत उद्यान बांधले असून सदरच्या उद्यानास भोसरी मधील जुन्या पिढीतील धार्मिक क्षेत्रातील कै.वामनराव गव्हाणे (पाटील) उद्यान असे नाव सुचवत आहे. तरी सदरील गव्हाणे वस्ती, भोसरी येथील उद्यानास कै.वामनराव गव्हाणे (पाटील) उद्यान हे नाव देण्याबाबत कार्यवाही तात्काळ करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
भिमाबाई पोपट फुगे
अध्यक्षा
इ प्रभाग समिती
भोसरी – ३९.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - ३९
क्र-इक्षेका/कावि/४/१२३२/२०१७
दिनांक- १८/१०/२०१७

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ क्षेत्रीय कार्यालय
भोसरी – ३९.

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.